**रे.दि.मु.नं. ३५/२००९ मधील नि.५० खालील आदेश.**

प्रस्तुत अर्ज वादीने त्याचे विरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात वादीचे कथन की, सदरकामी वादी हा दि.०५.०४.२०१७ रोजी मे. न्यायालयासमोर हजर राहू शकला नाही. त्यामुळे पुरावा बंदचा आदेश झाला आहे. वादी हा नोकरीस असल्यामुळे त्याला रजा मिळू शकली नाही व त्यामुळे तो न्यायालयात हजर राहू शकला नाही. प्रस्तुत दावा हा मालकी हक्क मिळकतीबाबत असल्यामुळे वादी यांना जादा पुरावा देणे आवश्यक व जरुरी आहे. अन्यथा वादी यांचे न्याय हक्काचे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यास जादा पुरावा देण्यास परवानगी मिळणे आवश्यक आहे. सबब, वादी विरुध्द पुरावा बंदचा झालेला आदेश न्यायाचे दृष्टीने रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे म्हणणे देण्यात आले व प्रतिवादीने वादीच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे कथन की, वादीचा अर्ज कायदेशीर नाही. न्यायालयाने दि.०५.०४.२०१७ रोजी पुरावा बंद केला आहे. वादी हा सांगोला येथे बँकेत नोकरीस आहे. न्यायालयाने वादीस पुर्वी देखील संधी दिल्या आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी, प्रतिवादी वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा जाहीर होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे मौल्यवान हक्क व अधिकार गुंतले आहेत. वादीचे कथन की, सदरकामी वादी हा दि.०५.०४.२०१७ रोजी मे. न्यायालयासमोर हजर राहू शकला नाही. त्यामुळे पुरावा बंदचा आदेश झाला आहे. वादी हा नोकरीस असल्यामुळे त्याला रजा मिळू शकली नाही व त्यामुळे तो

न्यायालयात हजर राहू शकला नाही. प्रस्तुत दावा हा मालकी हक्क मिळकतीबाबत असल्यामुळे वादी यांना जादा पुरावा देणे आवश्यक व जरुरी आहे. अन्यथा वादी यांचे न्याय हक्काचे नुकसान होणार आहे. वादीने मुदतीमध्ये पुरावा न देण्याचे कारण शपथेवर कथन केले आहे. दाव्याचा संपूर्णपणे व कायमस्वरुपी व गुणदोषावर न्यायनिर्णय होणेसाठी वादींना पुरावा देण्याची संधी मिळणे नैसर्गिक न्यायतत्वाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादींचे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादींना पुरावा देण्यास झालेल्या विलंबासाठी खर्चाचा आदेश करुन अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रु.५००/– चे खर्चासह मंजूर करणेत येतो.

२. वादी विरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करणेत येतो.

सांगोला. (सा.ज.बोंद्रे)
दिनांक ०८.०१.२०१८. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सांगोला.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment

a)Name of the Stenographer :A.A.Chavan.

b) Court : Jt. Civil Court,Sangola

c) Judgment/Order signed by PO on : 08.01.2018

d) Judgment/Order uploaded on : 09.01.2018